दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १५२ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.३ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

बारामती शहर हे राज्यातील विकासाचे मॉडेल

तरुणांना राज्याचे भवितव्य घडविण्याची संधी, महारोजगार मेळाव्यात शिंदेंचे प्रतिपादन

बारामती–बारामतीकडे राज्यातील विकासाचे मॉडेल म्हणून पाहिले जाते. बारामतीच्या विकासात ज्येष्ठ नेते शरद पवार व अजित पवारांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे बारामतीला विकासाच्या बाबतीत पहिल्या क्रमांकाचा तालुका बनवण्यासाठी राज्य सरकार कोणतीही कसर ठेवणार नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी बारामतीत आयोजित नमो महारोजगार मेळाव्यात बोलताना केले.

बारामतीत शनिवारी नमो महारोजगार मेळावा झाला. या मेळाव्यात सरकारने जवळपास ४५ हजार तरुणांना रोजगार दिल्याचा दावा केला आहे. बारामतीमधील नमो महारोजगार मेळाव्यात हजारो तरुणांना रोजगार मिळणार आहे. सरकारने राज्यातील १० लाख तरुणांना रोजगार देण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. या प्रकरणी लवकरच २७ हजार पोलिस व ३० हजार शिक्षकांची भरती केली जाईल. या भरतीचा नुकताच आरक्षण मिळालेल्या मराठा समाजालाही मोठा लाभ होईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी बोलताना म्हणाले.आमचे सरकार लोकाभिमुख असल्याचे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बारामतीच्या विकासाचे कौतुक केले. बारामती शहर हे राज्यातील विकासाचे मॉडेल आहे. बारामतीच्या विकासात शरद पवार व अजित पवारांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे बारामतीला विकासाच्या बाबतीत पहिल्या क्रमांकाचा तालुका बनवण्यासाठी राज्य सरकार कोणतीही कसर ठेवणार नाही. उल्लेखनीय बाब म्हणजे अजित पवार यांच्याकडेच सध्या राज्याच्या तिजोरीच्या चाव्या आहेत. बारामतीत पोलिसांना चांगल्या सोयिसुविधा दिल्या आहेत. विकासात आम्ही राजकारण आणू इच्छित नाही. आमचे सरकार राजकारण विरहित आहे, असे ते म्हणाले.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, मराठा आरक्षणानंतर मराठा बांधवांनाही भरती प्रक्रियेत फायदा होणार आहे. २ कोटींहून अधिक लोकांना शासन आपल्या दारीचा फायदा झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. तर बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांची चांगली मैत्री होती, आज अजित पवार आणि शरद पवार दोघेही मंचावर आहेत.हा महारोजगार मेळावा तरुणाच्या हाताला काम देण्याचा उपक्रम आहे, राजकारणात काम करणारे आम्ही कंत्राटी कामगार, चांगले काम केले नाही तर जनता घरी बसवते असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी म्हटले आहे. तर अजितदादांनी मेळाव्यासाठी मोठी मेहनत घेतली असेही त्यांनी म्हटले आहे. सरकारकडून कौशल्यविकासाचे काम सुरू आहे.रोजगारनिर्मीतीवर लक्ष दिल्याने शरद पवार यांनी सरकारचे आभार मानले. नव्या पिढीला काम मिळाले पाहिजे, असे मत शरद पवार यांनी व्यक्त केले. राज्यात रोजगार निर्माण करण्याची गरज आहे, मेळाव्यासाठी अनेक कंपन्यांचे प्रतिनिधी दाखल झाले आहेत, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.लोकसभा निवडणुका जसजसा जवळ येत आहेत, तसतसे पवार कुटुंबात काही तरी घडत असल्याचे दिसत आहे. पवार कुटुंबातील नाराजी आता प्रकर्षाने समोर येत असून जाहीर कार्यक्रमातूनही ती

दिसताना पाहत आहे. बारामतीत सुरू असलेल्या राज्य सरकारच्या नमो रोजगार मेळाव्यात आज उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सुप्रिया सुळे एकाच मंचावर होते. एकमेकांच्या बाजूलाच उभे होते. पण दोघांनीही एकमेकांकडे पाहणे आणि भेटणे टाळले. सुप्रिया सुळे सर्वांना भेटल्या. विचारपूस केली. पण दादांची विचारपूस केली नाही. यापूर्वी पवार कुटुंबात असे कधीच घडले नव्हते. बारामतीकरांनी मात्र हे चित्र पहिल्यांदाच पाहिले. त्यावेळी अनेकांना आश्चर्यही वाटले.खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, सर्वच पक्षांतील नेत्यांशी आपले मैत्रीपूर्ण संबंध आहेत. वैचारिक मतभेत असतात आणि यापुढेही राहतील. मात्र विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी काही चांगले होत असेल तर एकत्र आले पाहिजे. त्यासाठी आम्हाला या कार्यक्रमासाठी भारत सरकारने आमंत्रित केले आहे. तर नमो रोजगार मेळाव्यातून सुरुवातीला ४३ हजार नोकऱ्या मिळणार असल्यांची माहिती मिळाली होती, त्यानंतर ३० नोकऱ्या मिळणार असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. मात्र हा महा रोजगार मेळावा नसून महास्किल कार्यक्रम असल्याचे त्यांनी म्हटले आहे. बारामतीत विद्या प्रतिष्ठानमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात एआय संदर्भात एक लॅब तयार होत आहे. त्यासंदर्भात चर्चा झाली. सुनेत्रा पवार यांच्याशी कोणतीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.बारामतीत शनिवारी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत नमो रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आले आहे. मात्र चर्चा रंगलीय ती या मेळाव्याच्या आडून होणाऱ्या निमंत्रण आणि आमंत्रणाच्या राजकारणची. बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर होणाऱ्या या कार्यक्रमाच्या कार्यक्रम पत्रिकेत शरद पवारांच नावच नसल्याने शरद पवारांना या कार्यक्रमास का बोलाविण्यात आले नाही याची चर्चा सुरु झाली. दुसरीकडे शरद पवारांनी मात्र मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना चहापानाचेच नाही तर जेवणाचेही आमंत्रण देऊन टाकले. त्यानंतर, नवीन निमंत्रण पत्रिका छापून त्यामधे शरद पवारांचे नाव छापण्याचा निर्णय घेण्यात आला.बारामती येथे नमो रोजगार मेळाव्यानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांची उपस्थिती असणार आहे. यानिमित्ताने राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी शिंदे यांच्यासह फडणवीस आणि अजित पवार यांनाही स्नेहभोजनाचे निमंत्रण दिले होते. मात्र, फडणवीस यांनी शुक्रवारी पवारांना पत्र पाठवून आपले निमंत्रण मिळाले, त्यासाठी आभारी आहे. मात्र, नियोजित कार्यक्रम असल्यामुळे भोजनास येऊ शकत नसल्याचे म्हटले आहे.मागील काही दिवसांपासून नमो रोजगार मेळाव्याची राजकीय वर्तुळाच चर्चा रंगली. शरद पवारांचे नाव पत्रिकेतून वगळण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी संस्थेचे अध्यक्ष म्हणून या कार्यक्रमात उपस्थित राहण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानंतर आता शरद पवार नमो रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी पोहचले आहेत. बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर हा कार्यक्रम पार पडत आहे.

मूल तालुक्यात अवैध तंबाखु विक्री तेजीत

आता जिल्हा पोलीस अधिक्षकांनी लक्ष देण्याची गरज

मूल । प्रतिनिधी

तालुक्यात अवैध सुगंधीत तंबाखु विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असतानाही ना पोलीस प्रशासन लक्ष देत ना अन्न औषध प्रशासन, यामुळे आता खुद्द जिल्हा पोलीस अधिक्षकांनी लक्ष देवुन तालुक्यात तेजीत सुरू असलेल्या अवैध सुगंधीत तंबाखु विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्याची गरज आहे.

झटपट पैसे कमाई करण्याच्या लोभापाई युवकांना अक्षरशः विष खाऊ घालणाऱ्या सुगंधीत तंबाखु माफियांकडुन राज्याने बंदी घातलेल्या सुगंधीत तंबाखुची सर्रास विक्री होत आहे. तालुक्यातील अनेक दुकानांमध्ये मूलच्या सुगधीत तंबाखु माफियांकडुन पुरवठा केला जात असतांनाही त्यांच्यावर अन्न व औषध प्रशासन व पोलीस प्रशासन कारवाई का करीत नाही हा चिंतनाचा विषय ठरला आहे.मूल शहरातील गोळया बिस्किटच्या २ दुकानदाराकडुन सुगंधीत तबाखुची तालुक्यात तस्करी केल्या जात असल्याची खमंग चर्चा मूल शहरात आहे. चंद्रपूर येथील जयसुख आणि वसिम नामक सुगंधीत तंबाखु माफिया मूल येथील तिन ते चार तस्करांना सुगधीत तंबाखुचा पुरवठा करीत आहेत. त्यांच्या मार्फतीने मूल तालुक्यात अवैध सुगधींत तंबाखु विक्री केली जात आहे. तालुक्यातील अल्पवयीन मुले, विद्यार्थी, तरूण वर्ग मोठया प्रमाणावर सुगंधीत तंबाखुच्या आहारी जात आहे.लोकांच्या शरीरात विष पेरणाऱ्या आणि लोकांच्या जीवाशी खेळ खेळणाऱ्या सुगंधित तंबाखु माफियावर कारवाई होईल का ? झोपी गेलेल्या अन्न व औषध प्रशासन व पोलीस प्रशासन या दोनही विभागाला जाग येईल का? सुगंधित तंबाखु आणि गुटखाबंदी कायदा केवळ नावापुरताच असल्याचे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दिसून येत आहे. दररोज हजारो लोकांच्या शरीरात विष पेरणाऱ्या सुगंधित तंबाखु माफियांवर अंकुश कोण लावणार असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरीकांना पडला आहे.

सुगंधीत तंबाखु विक्री बंद करा अन्यथा आंदोलन करू:मंगेश पोटवार

मूल तालुक्यात मोठया प्रमाणावर अवैध सुगंधीत तंबाखु विक्री होत आहे, यासंबधाने अन्न व औषध प्रशासन मंत्री आणि अधिकाऱ्याकडे तक्रार केलेली आहे. येत्या १५ दिवसात कारवाई न झाल्यास तहसील कार्यालयासमोर आंदोलन करू अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे मूल तालुकाध्यक्ष मंगेश पोटवार यांनी दिली.

सहा दरोडेखोरांना २४ तासात हुडकून काढले

बकऱ्या चोरीचा लावला छडा

सिंदीरेल्वे । प्रतिनिधी

समीपच्या परसोडी शिवारातील शेतात दरोडा टाकून ४२ बकऱ्या आणि आठ बोकड चोरणाऱ्या दरोडेखोरांना पकडण्यात स्थानिक पोलिसांना यश आले.अवघ्या २४ तासात पोलिसांनी सर्व आरोपींच्या मुसक्या आवळल्यात.

याबाबत पोलिस निरीक्षक वंदना सोनुने माहिती देतांना म्हणाल्या कीं,परसोडी गावात काही दिवस वास्तव्यास असणाऱ्या अरुण मोहिते याचा युगल औचट यांच्या पशूधनांवर डोळा होता.त्याने त्याचे नातलग दीपक जाधव,राहूल पवार,चरण पवार,अजय जाधव सर्व रा. गौराळा ता.हिंगणा तथा चंदपूर निवासी संजय बांगडे यांच्या मदतीने गुरुवारी पहाटे औचट यांच्या शेतातून बकऱ्या आणि बोकड पळवून नेलीत.त्यावेळी दरोडेखोरांनी औचट यांच्या दोन सालगड्यांना अमानुष मारहाण केली व आपल्या सोबत नेले होते.

युगल औचट यांच्या तक्रारीवरुन पोलिसांनी प्रारंभी भादंविच्या ३८१ आणि ३४ कलमान्वये गुन्हा नोंदवून तपासाची चक्रे

फिरवली. शेवटी शुक्रवारी पहाटे पोलिसांना सर्व आरोपी व मुद्देमाल हेटी–किन्ही शिवारात मिळाला.पोलिसांनी बाजीरावचा प्रसाद देताच सर्वांनी गुन्ह्याची कबुली दिली.आरोपींकडून १लाख २ हजार ३०० रु.रोख,वाहन एम एच–२७/ बी,एक्स. ८४८९(मूल्य सात लक्ष रु.),४ मोबाईल असा एकूण ८,३२३०० रुपयांचा जुमला हस्तगत केला.सर्व आरोपीविरुध्द भादंविच्या कलम३९५,३६३,५०६ अन्वये गुन्हा नोंदवला.सदरची कारवाई पो.अधीक्षक नुरुल हसन,वरिष्ठ उप विभागीय अधिकारी सागर कवडे, उपविभागीय पो.अधिकारी प्रमोद मंकेश्वर यांच्या मार्गदर्शनात पो.नि.सोनुने, ठाणेदार शामसुंदर सूर्यवंशी, आनंद भस्मे,उमेश खामणकर,कांचन चाफले,संदेश सोयाम आणि नितीन नखाते यांनी पार पाडली.

गोंडपिपरी खरारपेठ मार्गावर आढळला युवकाचा मृतदेह

गोंडपिपरी । सुरज माडुरवार

खरारपेठ मार्गावर ४२ वर्षीय युवकाचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली.दि.१ शुक्रवारी खरारपेठ येथील मुख्य रस्त्यावर मुंजणकर यांच्या घराजवळ रात्री ११ वाजता ४२ वर्षीय इसमाचा मृतदेह आढळला.रस्त्याने प्रवास करताना गावातील जगदीश अवथरे यांना व प्रवाशांना तो मृतदेह दिसला.त्यानंतर घटनेची माहिती ठाणेदार हत्तिगोटे, पिएसआय मोगरे यांना दिली लागलीच घटनास्थळी पोलिस दाखल होऊन मृतदेह ताब्यात घेत उत्तरीय तपासणीसाठी पाठविले.मृतकाची ओडख पटली असून मृतकाचे नाव बंडू पोचू धुरके वय (४२) रा. मुदोली रीट ता.चामोर्शी,जी गडचिरोली असून मृतकाच्या शरीराला जखमा न्हवत्या व त्याचे गाव घटनेपासून २० किलोमिटर अंतरावर असून बाजूला कुठलेही वाहन न्हवते त्यामुळे अनेक चर्चेला उधाण येत असून नेमका मृत्यू अपघाताने झाला की घातपात कारण अद्याप गुलदस्त्यात आहे. पुढील तपास गोंडपिपरी पोलीस करत आहे.

लोकशाहीची चार मूल्ये मोदीच्या काळात धोक्यात आली आहेत–प्रा.श्याम मानव

पोंभूर्णा येथे झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी व्यक्त केली चिंता

पोंभूर्णा । प्रतिनिधी

आजची राजकीय परिस्थिती पाहिली तर मोदीच्या काळात लोकशाहीची प्रमुख चार मूल्ये धोक्यात आली आहेत.अवैज्ञानिक गोष्टीचा अवलंब करून देशाची लोकशाही खिळखिळी केली जात आहे.हिंदू राष्ट्र संकल्पनेचा जाहीर प्रचार करताना मनुस्मृतीच्या कायद्याचे उघडपणे समर्थन केले जात आहे.लोकशाही टिकविण्यासाठी जनता जागृक असणे आवश्यक असल्याचे राजकीय विश्लेषक व अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक संघटक प्रा. श्याम मानव यांनी दि.२९ फेब्रुवारी गुरूवारला सायंकाळी ६ वाजता पोंभूर्णा येथील वनविभागाच्या विश्रामगृहात झालेल्या पत्रकार परिषदेत सांगत होते.विविध सामाजिक संघटना कृती समिती पोंभूर्णा द्वारा आयोजित भारतीय संविधान लोकशाही पुढील आव्हाने या विषयावर आयोजित २५ वे जाहीर व्याख्यान कार्यक्रमाच्या निमित्ताने पोंभूर्ण्यात आले असता पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला.

लोकशाहीतील समता, बंधुता, न्याय व अभिव्यक्ती ही प्रमुख चार मूल्ये सात्यत्याने पायदळी तुडविली जात आहेत.मागिल दहा वर्षांत प्रशासकीय यंत्रणा ही केवळ राजकीय पक्षासाठी काम करताना दिसत आहे. विषमतेची दरी सातत्याने वाढत आहे. दोन धर्मांमध्ये जाणीवपूर्वक तेढ निर्माण करण्याचे काम राज्यकर्त्यांकडून केले जात आहे.रिझर्व्हेशन संपवण्यात येत आहे.खाजगीकरणाच्या नावाखाली अख्खा देश भांडवलदारांना बहाल करण्यात आला आहे.सरकारी नोकऱ्या संपुष्टात आणून आरक्षणातून मिळणारी समना संधीदेखील हिरावून घेतली जात आहे.मोदी हिटलरच्या मार्गाने चालत आहेत.गांधी नेहरूच काँग्रेस ने जे चार मुल्ये जपण्याचा काम केला ते चार मुल्ये मोदींच्या काळात संपलेली

आहे.हिंदू राष्ट्र संकल्पनेचा जाहीर प्रचार करताना मनुस्मृतीच्या कायद्याचे उघडपणे समर्थन केले जात आहे.आताच्या राज्यकर्त्यांनी आणीबाणी पेक्षाही भयावह स्थिती निर्माण केली आहे. आणीबाणीच्या काळात किमान ताकदीने विरोधात बोलता येत होते. आता ती सोय राहिलेली नाही.असेही ते यावेळी बोलले.धीरेंद्रकुमार शास्त्रीसारख्या बच्चा बाबाबुवांना सत्ताधाऱ्यांकडून संरक्षण दिले जात आहे.नागपूरात अंनिसने उघड आव्हान केल्यानंतर धीरेंद्रकुमार शास्त्री नागपूरमधून पळून जातो.मात्र भाजपाकडून याच बागेश्वरधाम बाबाला संपूर्ण महाराष्ट्रात फिरवून त्याचा दरबार भरविला जातो.यातून आपण कुठल्या दिशेला जात आहोत याचा अंदाज येतो.त्यामुळेच ४१ वर्षांनंतर सामाजिक क्षेत्रात काम करताना राजकीय भूमिका घेण्याची वेळ आज आली आहे असे प्रा.श्याम मानव यांनी सांगितले.मोदी हे अर्धवट निर्णय घेणारे पंतप्रधान असल्याची टिका करतांनाच २०२४ मध्ये मोदीला हाकलून लावणे काळाची गरज झाली आहे असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.यावेळी पत्रकार परिषदेला अंनिसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुरेश झुरमुरे, भगवान खराते यांची उपस्थिती होती.

संकटग्रस्त प्राण्यांना विशेष संरक्षण!

वन्यजीवांचे संरक्षणासह नागरिकांमध्ये त्याबाबत जागृती करण्याच्या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघाच्या थायलंड येथील सभेत जागतिक वन्यजीव दिन साजरा करण्याचे घोषित करण्यात आले. त्यानंतर आजतागायत ३ मार्च हा जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. पृथ्वीवर असलेल्या प्रत्येक जीवाला जगण्याचा अधिकार आहे. मात्र काही विकृतांकडून पृथ्वीवरील दुर्मीळ वृक्ष, दुर्मीळ प्राणी, झाडांच्या प्रजातींची तस्करी करण्यात येते. याला आळा घालण्यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात आले. महत्वपूर्ण व ज्ञानवर्धक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींच्या या संकलित लेखातून वेचून घ्यावी... संपादक.

संयुक्त राष्ट्राच्या महासभेने सन २०१३ला यासाठी विश्व वन्यजीव दिवस ३ मार्चला घोषित केला. त्यानुसार दरवर्षी जागतिक वन्यजीव दिन साजरा करण्यात येतो. पृथ्वीवरील प्रत्येक वन्यजीवाला मानवासारखाच राहण्याचा आणि जगण्याचा अधिकार असल्याचे या दिवसातून पटवून देण्यात येते. दरवर्षी ३ मार्चला जागतिक वन्यजीव दिन साजरा करण्याची सुरूवात थायलंडपासून करण्यात आली. पृथ्वीवर असलेल्या जंगली जीवांना मुक्तपणे संचार करण्याचा आणि त्यांच्या हक्काबाबतची जागरुकता वाढवण्याबाबत या जागतिक वन्यदिनातून पटवून देण्यात आले. वन्य जीवांचे अनुवांशिक, वैज्ञानीक, सौंदर्यासहीत विविध बाबतींच्या अभ्यासाला चालना देण्याचे धोरणही यावेळी पटवून देण्यात आले. त्यामुळे थायलंडमधील बँकॉक येथे झालेल्या पहिल्या वन्यजीव दिनापासून ते आजपर्यंत जागतिक वन्यदिनाला संयुक्त महासभा विविध थीम घेऊन कार्य करते. जागतिक वन्यजीव दिनाची पार्टनरशीप फॉर वाईल्ड लाईफ कंझर्वेशन ही थीम असल्याचे संयुक्त राष्ट्रसंघाच्या वतीने घोषीत करण्यात आले आहे. पृथ्वीवर असलेल्या वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी विश्व वन्यजीव दिन साजरा करण्यात येतो. यासाठी दरवर्षी संयुक्त राष्ट्र संघाकडू एक थीम घेऊन त्यावर काम करण्यात येते. त्यासह नागरिकांमध्ये जनजागृतीही करण्यात येते. संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिक वन्यजीव दिन घोषित केल्यापासून आतापर्यंत विविध थीम घेऊन काम करण्यात आले आहे. सन २०१५मध्ये वन्यजीवांच्या गुन्ह्यांविरोधात गंभीर होण्याची गरज असल्याची थीम घेऊन काम करण्यात आले. संयुक्त राष्ट्र संघाने सन २०१६मध्ये वन्यजीवांचे भविष्य आपल्या हातात असल्याची थीम घेऊन काम केले. सन २०१७मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने युवकांनो' आवाज ऐका! अशी थीम घेऊन काम केले आहे. सन २०१८ला संयुक्त राष्ट्र संघाने मांजरांच्या प्रजातीतील वन्यजीव धोक्यात असल्याची थीम घेऊन त्यावर जनजागृती केली. सन २०१९ला नागरिक आणि ग्रहांसाठी पाण्याच्या खाली जीवन अशी थीम घेऊन संयुक्त राष्ट्राने जनजागृती केली, तर सन २०२०ला पृथ्वीवर जीवन कायम ठेवणे, ही थीम घेऊन काम केले. यावर्षी वन्यजीव संरक्षणासाठी योगदान, अशी थीम घेऊन संयुक्त राष्ट्रसंघ जनजागृती करत आहे.

जागतिक पातळीवरील नागरिकांचे जीवन जल आणि जंगलावर अवलंबून आहे. मात्र तरीही अनेक जंगली प्राण्यांच्या आणि वन संपती तस्करी करण्याच्या घटना घडत होत्या. त्याला आळा घालण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने दि.३ मार्च १९७३ला वन्यजीव आणि वनस्पतीच्या व्यापाराला रोखण्यासाठी करारावर सही केली होती. त्यानंतर थायलंडमधील बँकॉक येथे संयुक्त राष्ट्र संघाचे अधिवेशन दि.२० डिसेंबर २०१३ला आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात वन्यजीवांच्या तस्करीला रोखण्यासाठी आणि त्याबाबत जनजागृती करण्यासाठी हा जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवण्यात आले. तेव्हापासून हा जागतिक वन्यजीव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. एखाद्या विशिष्ट भूभागात वन्यजीवांच्या एकूण संख्येपैकी विविध प्रजातींच्या पैदासक्षम प्राण्यांची सरासरी संख्या त्यांचे नैसर्गिक परिसंस्थेतील अस्तित्वदर्जा ठरवतात. धोक्याच्या पातळी बाहेर, संकटग्रस्त, नामशेष प्रवण, नष्ट अशा विविध प्रवर्गात वर्गवारी करता येईल. त्यानुसार दुर्मिळ वन्य प्रजातींना संरक्षण देण्याचे काम कायद्यान्वये वन विभागामार्फत केल्या जाते. विविध निसर्ग अभ्यासक, शास्त्रज्ञ यांचे संशोधनातून संरक्षण पद्धतीचे नियोजन करण्यास मदत होते. आईयूसीएन या निसर्ग संवर्धनाचे काम करणार्या एका आंतरराष्ट्रीय संस्थेच्या अहवालनुसार भारतात आजमितीला एकूण १७२ प्रजाती संकटग्रस्त आहेत. यात सस्तन प्राण्याच्या ५३, पक्ष्यांच्या ६९, सरीसृप २३ आणि उभयचर प्राण्यांच्या ३ प्रजातींचा समावेश होतो. पट्टेरी भारतीय वाघ, सिंह, जंगली मांजर, काश्मिरी काळवीट, राजहंस, माळढोक, कासव असे अनेक वन्यपशुपक्षी संकटग्रस्त आहेत. त्यासाठी वन्य पक्षी संरक्षण कायदा– १८८७, हत्ती जतन कायदा– १८७९, भारतीय मत्स्य कायदा– १८९७, भारतीय वन कायदा– १९२७, बॉम्बे वन्य पशू व वन्य पक्षी संरक्षण कायदा– १९५१, प्राणी क्लेश प्रतिबंधात्मक कायदा– १९६०, वन्यजीव संरक्षण राष्ट्रीय प्रणाली– १९७०, वन्यजीव संरक्षण कायदा– १९७२ सुधारित १९९१, भारतीय जैवविविधता कायदा– २००२ याप्रमाणे आहेत. भारतीय वन्यजीवांच्या संरक्षणार्थ शासकीय आणि बिगरशासकीय पातळीवर अनेक अंगांनी प्रयत्न केले जात आहेत. अवैध शिकार, जंगलतोड, तस्करी यांना आळा घालण्यासाठी संवैधानिक कायदे व नियम केल्या गेले आहेत. सन १९७२मध्ये अस्तीत्वात आलेला वन्यजीव संरक्षण कायदांतर्गत राष्ट्रीय वन्यजीव उद्याने एकूण १०४, वन्यजीव अभयारण्ये एकूण ५४३, व्याघ्र प्रकल्प, पक्षी अधिवास यांच्या माध्यमातून वन्यजीवांना अभय देण्यात येत आहे. तसेच प्रोजेक्ट टायगर– १९७३, प्रोजेक्ट एलिफंट– १९९३, ईको डेवलपमेंट प्रोजेक्ट, सुसर पैदास प्रकल्प– १९७५ अशा विशिष्ट प्रकल्पांतून अति संकटग्रस्त प्राण्यांना विशेष संरक्षण दिल्या जाते. भारतीय वन्यजीव संस्था, डेहराडून व संकटग्रस्त प्रजातीसाठी संवर्धन प्रयोगशाळा– सीसीएमबी, हैदराबाद सारख्या शासकीय संस्थेसह वर्ल्ड वाइल्डलाइफ फंड, वाइल्डलाइफ ट्रस्ट ऑफ इंडिया, बीएनएचएस अशा अनेक नामांकित बिगरशासकीय संस्था संशोधन आणि लोकप्रबोधनाचे महत्वाचे काम करत आहेत. याशिवाय भारतात विविध शहरात असलेल्या वन्यप्राणी संग्रहालयाच्या, सर्पोद्यान माध्यमातून जनसामान्यात जनजागृतीचे कार्य केल्या जाते आहे.

महाराष्ट्रात वन्यजीवांच्या संरक्षणार्थ राष्ट्रीय उद्याने एकूण ५– संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, पेंच, ताडोबा, नवेगाव, गुगामल, व्याघ्र प्रकल्प एकूण ४– मेळघाट, ताडोबा– अंधेरी, पेंच, सह्याद्री, अभयारण्य एकूण ३२ संरक्षित क्षेत्रे आहेत. वन्यजीवांच्या संरक्षणात पशुवैद्यक क्षेत्राची भूमिका महत्वाची असून वन्य प्राण्यांचे रोगनिदान, औषधोपचार, लसीकरण, भूल, शवविच्छेदन, फॉरेन्सिक चाचण्या अशा विविध प्रसंगी तज्ञ पशुवैद्यक असणे जसे गरजेचे आहे तसे विविध भागातील वन्यजीव संपदेचे संरक्षण करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने पशुगणना, प्रजनन आणि आनुवंशिकता लक्षात घेत पैदास व्यवस्थापन, संसर्गजन्य रोगाचे प्रतिबंधात्मक उपाय आणि वन्यजीव व्यवस्थापन करण्याहेतू पशुवैद्यकांचे शास्त्रीय दृष्टीकोन इतर जीवशास्त्रज्ञांच्या समवेत योजनाबद्ध नियमावली करण्यासाठी दिशादर्शक ठरू शकतात. राज्य शासनाच्या वन विभाग आणि महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर यांचे संयुक्त प्रयत्नातून गोरेवाडा, नागपुर येथे साकारलेले ट्रांजिट ट्रीटमेंट सेंटर तसेच भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद– आयसीएमआरच्या संयुक्त प्रयत्नातून स्थापित झुनोसेस सेंटर याप्रमाणे सर्पदंश लस निर्मितीसाठी हाफकिन संशोधन संस्था, मुंबई वगैरे संस्था वन्यजीव संपदा संरक्षित करण्याचे प्रयत्न करत आहेत. आजच्या तरुण पिढीने वन्यजीव संरक्षणासाठी पुढे सरसावणे गरजेचे आहे. समाज माध्यमांवर आपली तडफदार पर्यावरणवादी भूमिका मांडणारे युवा वन्यजीव शिक्षण, संशोधन, विस्तारकार्य, प्रशासन अशा विविधांगी भूमिकातून जोरकसपणे नेतृत्व करणे अपेक्षित आहे. आपल्या परिसरातील वन्यजीव संबंधी कार्यरत संशोधन, शैक्षणिक तथा समाजसेवी संस्थांशी जोडले जावे. वन्यजीव संपदा ही निसर्गातील विस्तृत परिसंस्थेतील महत्वाचा घटक असून वने, मानव यांचेशी सामायिकपणे जोडलेले असल्याने वन्यजीवांचे संरक्षण, हे पुढील काळातील मानवी अस्तित्वासाठी देखील तितकेच आवश्यक आहे.मानवी अस्तित्व उत्क्रांतीच्या प्रवाहात आणि निसर्गाच्या कक्षेत उभे राहत असताना वन्यजीव संपदेने महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. याची जाणीव आगामी काळात तेवढीच सुस्पष्ट असावी, या हेतूने हा दिवस जगभर जागतिक वन्यप्राणी दिन म्हणून साजरा केला जातो. सन १९७३च्या जागतिक संकटग्रस्त वन्य प्राणी आणि वनस्पतीच्या आंतरराष्ट्रीय व्यापार संबंधी परिषदेतील ठरावास संयुक्त राष्ट्रांनी स्वाक्षरी केल्याची आठवण म्हणून वर्ष २०१३पासून वन्यप्राण्यांच्या रक्षणासाठी कटिबद्धतेचे प्रतीक म्हणून जागतिक पातळीवर वन्यप्राणी दिन साजरा केला जातो. या निमित्ताने मानव वन्यजीव संघर्षांची किनार काही भागात गडद असताना नैसर्गिक परिसंस्थेच्या समतोल विकासासाठी संवर्धनाचे उपाययोजनाचे चिंतन केल्या जाते. वन्यजीव संरक्षणासाठी भागीदारी, ही सन २०२३ची मध्यवर्ती संकल्पना आहे. विविध कारणांनी मानवाकडून नैसर्गिक परिसंस्थेस हानी पोचविल्या जात आहे, ज्यामुळे वन्यजीव संपदा– प्राण्यांचे आणि वनस्पतीचे अस्तित्व धोक्यात येत आहे. जागतिक निसर्ग संरक्षण संघटनेने नोंदविलेल्या निरीक्षणानुसार आजमितीला सुमारे ८ हजार ४०० वन्यजीव प्रजाती या धोक्याच्या पातळीवर आहेत, तर सुमारे ३० हजार प्रजाती संकटग्रस्त होण्याच्या मार्गावर आहेत. निसर्गाचा समतोल हा केवळ वन्यजीवांसाठी गरजेचा नसून मानवी अस्तित्वासाठी देखील महत्वाचा ठरतो म्हणून वन्यजीव संपदेचे संवर्धन समजून घेणे आवश्यक आहे.

!! जागतिक वन्यजीव दिनानिमित्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३

शासकीय निवडणूक नाव नोंदणी आयकॉन पदी निवडीबद्दल डॉ.कालानी चा हृद्दयसत्कार

परभणी । प्रतिनिधी

राष्ट्रजन फाउंडेशन परभणी च्या वतीने परभणी जिल्ह्यातील सुप्रसिद्ध जलमित्र स्वच्छता त ज्येष्ठ समाजसेवक डॉक्टर राजगोपाल कालानी सर यांची परभणी जिल्हा लोकसभा शासकीय निवडणूक नाव नोंदणी आयकॉन पदी निवड नियुक्ती झाल्याबद्दल हार्दिक स्वागत व सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्र जन फाउंडेशन महाराष्ट्र हिंगोली लोकसभा प्रमुख युवा समाजसेवक आर एन बांगर प्रमुख पाहुणे वृत्तपत्र विक्रेते संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव वाकोडे पाटील शिवशक्ती मित्र ग्रुपचे समाज कल्याण चे अधिकारी बबन स्वामी आय एम चे सेक्रेटरी सागर मोरे कार्यक्रम सत्कार आयोजक राष्ट्रजन फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांच्यावतीने कालानी हॉस्पिटल परभणी येथे दिनांक एक मार्च २०२४ रोजी रात्री आठ वाजता स्वागत व सत्कार करण्यात आले अशी माहिती गो सेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकाद्वारे माहिती दिली.

आई इंग्लिश स्कूल मध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी आनंदनगरी कार्यक्रम संपन्न

प्रमूख पाहूण्यासह मान्यवर पालकांनी घेतला आनंदनगरीचा आस्वाद

मानवत । प्रतिनिधी

मानवत शहरातील आई फाऊंडेशनच्या आई इंग्लिश स्कूल मध्ये दिनांक.२९ फेब्रुवारी २०२४ रोजी शालेय मुलांच्या सर्वांगीन विकासासाठी आई इंग्लिश स्कूल मध्ये आनंदनगरी कार्यक्रम संपन्न झाला.

सविस्तर वृत्त असे की,दरवर्षी प्रमाणे या हि वर्षी आई इंग्लिश स्कूल मध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण कला गूणांचा विकास व्हावा या दृष्टीने विविध उपक्रम राबविले जातात आज शाळेच्या वतीने आनंदनगरी कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून मानवत नगर परिषदेच्या मुख्याधिकारी– कोमलताई सावरे, मानवत नगरीच्या प्रथम नागरीक म्हणून मानवत नगर परिषदेच्या माजी नगराध्यक्षा सौ राणीताई अंकुशरावजी

लाड, माजी नगरसेविक– मिराताई कुऱ्हाडे , आई शाळेच्या अध्यक्षा सर्वेसर्वा सौ, जयश्री रामभाऊ घटे , यांची या प्रसंगी विशेष उपस्थिती होती.आई शाळेच्या वतीने घेण्यात आलेल्या आनंदनगरी कार्यक्रमामध्ये शालेय विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी या वेळी उपस्थित सर्व पालक वर्ग यांनी चिमुकल्यांचे प्रोत्साहन वाढवण्यासाठी व त्यांनी बनवलेले विविध पदार्थ खरेदी करून आणि विविध प्रकारचे पदार्थ यांचा आस्वाद घेतला.तर यावेळी उपस्थित पालकांनी व मान्यवर पाहूण्यांनी आंदनागरीचा आनंद वाढविला. आई इंग्लिश स्कूलच्या वतीने दरवर्षी मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी हा कार्यक्रम आपण राबवितो अशी प्रतिक्रिया या वेळी शाळेचे संचालक मूक्तिराम गोरे यांनी दिली. दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी आपण हा उपक्रम राबवला असून यामध्ये मुलांना खरेदी– विक्री व तोटा– नफा प्रत्येक्षात कसा होतो हि संकल्पना लक्षात आणून दिली असून त्यामूळे मुलांना व्यवहारीक ज्ञान होते व मुलांच्या जिज्ञासू वृत्तीची वाढ होते असे गोरे या वेळी म्हणाले.

'माता व बालसंगोपन' ला जिल्हा नियोजन मधुन 3 कोटी निधी मंजूर

जिल्हा प्रशासन सकारात्मक मात्र लोकप्रतिनिधी उदासीन–डॉ.गणेश ढवळे

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालय आवारातील महिला व बाल रूग्णांसाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मधुन २१ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेली २०० खाटांची ५ मजली ईमारत निधी अभावी फायर फिटींग व आक्सिजन पाइपलाइन कामे रखडल्याने वर्षभरापासून धुळखात पडुन आहे. या विषयी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सहकाऱ्यांसमवेत आंदोलन करत पाठपुरावा केला होता. याची दखल घेत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक बडे आणि जिल्हाधिकारी दीपा मुधोळ –मुंडे यांच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे जिल्हा नियोजन समिती मधुन ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करत राखुन ठेवण्यात आला आहे. त्यामुळे लवकरच इमारतीचे रूग्णालयात रूपांतर होऊन गर्भवती महिला व बालरूग्णांची सोय होणार असल्याने हेळसांड थांबणार आहे. या विषयी अधिक माहिती अशी की बीड जिल्हा रुग्णालयाची खाटांची क्षमता ३२० असली तरी आंतररुग्ण विभागात ५०० च्या जवळपास रूग्ण भरती असतात. शासनाने सर्व आरोग्य सेवा मोफत केल्याने बाह्यरुग्ण विभागात दररोज साधारण १५०० रूग्ण तपासणीसाठी येतात. जुनी रूग्णालयाची ईमारत जुनाट आणि अपुरी आहे. येथे सोनोग्राफी केंद्र असुन या केंद्राच्या समोरच्या बाजूला एक्स रे मशिन विभाग आहे. दोन्हीच्या मध्ये

केवळ व्हरांडा असुन सोनोग्राफीसह एक्स रे करण्यासाठी येणाऱ्या रूग्णांची नियमितची संख्या ४०० च्या घरात आहे. यात महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर त्यामुळे गर्भवती महिलांना ताटकळत उभे रहावे लागते. गर्भवतींना याचा त्रास होतो. अपुरी जागा, अपुरे खाट व कोंदट वातावरण या मुळे गर्भवतींच्या आरोग्यावरही परीणाम होत आहे. जिल्हा रुग्णालयात महिला व बालसंगोपन केंद्राची इमारत बांधुन पुर्ण झाली असली तरी विद्युतीकरण व आक्सिजन पाइपलाइन अभावी ईमारत वर्षभरापासून वापरात नाही. नव्या इमारतीमध्ये महिलांसाठीचे सर्व विभाग व सोनोग्राफी केंद्र आदींसाठी सोय असुन त्यामुळे महिलांची सोय होणार असुन गर्भवती महिलांची हेळसांड थांबणार आहे. या साठी जिल्हा प्रशासनाचा दृष्टीकोन सकारात्मक आहे मात्र लोक प्रतिनिधींची उदासीन दिसुन येते आहे. माता व बालसंगोपन ईमारत वापरात आणल्यास गर्भवती महिलांची हेळसांड थांबणार आहे या साठी विद्युतीकरण व आक्सिजन पाइपलाइन अभावी धुळखात पडुन असलेली इमारत वापरात आणावी या साठी वर्षभरापासून निवेदन तसेच आंदोलनाद्वारे पाठपुरावा करण्यात येत आहे. दरम्यान जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक बडे यांचा निधीसाठी आरोग्य विभाग, आरोग्य अभियान आयुक्तांकडे पाठपुरावा आणि जिल्हाधिकारी दीपा मुधोळ –मुंडे यांनी जिल्हा रुग्णालयाला भेट देत नेमकी अडचण जाणुन घेत सकारात्मक दृष्टिकोनातुन मध्यम मार्ग काढत जिल्हा नियोजन मधुन ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करत राखून ठेवला आहे. जिल्हाप्रशासनाचा दृष्टीकोन सकारात्मक असताना लोकप्रतिनिधी मात्र या प्रश्नांकडे गांभीर्याने पहात नसुन त्यांची उदासीनता दिसून येत असुन या बद्दल जनसामान्यात नाराजीचा सुर दिसुन येत आहे.

माजलगावात शेतकरी कामगार पक्षाचा विराट बैलगाडी मोर्चा

तर सरकार विरोधात आसूड उगारू भाई ॲड नारायण गोले पाटील

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षापासून शासनाने शेतकरी कर्जमाफीच्या नावाखाली झुलवत ठेवला असून २०२३ चा पिक विमा कृषीमंत्र्यांनी वारंवार घोषणाबाजी करून देखिल शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केलेला नाही, गेल्या दहा वर्षांपूर्वी कापसाला असणारा भाव आजही तोच असुन तो वाढवला जात नाही, सोयाबीनचा भाव प्रत्येक वर्षी कमी होत आहे आणि वयोवृद्ध शेतकऱ्यांना शासन दुर्लक्षित करून त्यांना पेन्शन द्यायला तयार नाही,बिड जिल्हा दुष्काळाच्या झळा सहन करत असताना जिल्ह्यात दुष्काळी उपाय योजना अद्याप सुरू झालेल्या नसून गुरांच्या चारा पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आलेला असताना आमदारासह मंत्री आपल्याच मोठेपणात व्यस्त आहेत, शासनाने १३८००० रुपयात गरिबांना घरकुल देण्याची बोगस योजना आणली असून गरीब घरकुल धारकांना सात हजार रुपये ब्राश ने चोरटी वाळू खरेदी करावे लागत आहे तर लोकनेते साखर कारखान्याने गतवर्षी जाहीर केलेला भाव अद्याप शेतकऱ्याला दिलेला नसून १४९रुपये प्रति टन शेतकऱ्यांची थकीत बिले त्वरित वाटप करणे आवश्यक आहे, तसेच चालू हंगामात हरभरा पिकावर धुक्यामुळे पडलेल्या रोगराईने हरभरा पिक पूर्णतः उध्वस्त झाले असून शेतकऱ्यांना हरभरा पिकाच्या नुकसानी पोटी हेक्टरी २५ हजार रुपये नुकसान भरपाई देणे गरजेचे आहे, माजलगाव तालुक्यातील सर्वात शासकीय कार्यालयात प्रचंड भ्रष्टाचार माजलेला असून भ्रष्टाचारामुळे अनेक कामे खोळंबून पडलेले आहेत याशिवाय महागाई चा आगडोंब दिवसेंदिवस वाढत असून कष्टकऱ्यांना, कामगारांना, शेतकऱ्यांना जीवन जगणे कठीण झाले आहे अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पशुधनासह सोलार व इतर चोऱ्या प्रचंड प्रमाणात वाढलेले असून त्याबाबत पोलीस यंत्रणा कुठलाही सखोल तपास करत म्हणून शेतकरी कामगार कष्टकरी यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे गरजेचे असल्याने शेतकरी कामगार पक्षाने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव येथे दि.१ मार्च २०२४रोजी सकाळी ०२ वाजता विराट बैलगाडी मोर्चा काढण्यात आला या मोर्चाचे नेतृत्व भाई मोहन गुंड,भाई ड.नारायण गोले पाटील यांनी केले या मोर्चात दिल्लीतील शेतकरी

आंदोलनाच्या मागण्या मान्य करा, शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करा. सन२०२३चा पिक विमा त्वरित वाटप करा,शेतकऱ्यांच्या शेतमालाला किफायतशीर हमीभाव द्या., शेतकऱ्यांच्या गुरांना दावणीला चारा-पाणी द्या,लोकनेते कारखान्या कडील गतवर्षीच्या प्रति टन १४९ रुपयाच्या थकित रकमेचे बिल त्वरीत वाटप करा, वयोवृद्ध शेतकऱ्यांना प्रतिमहा १०,०००/ रुपये पेन्शन द्या.धुक्यामुळे हरभरा पिकाच्या झालेल्या नुकसानीची हेक्टरी २५०००/नुकसान भरपाई द्या.. माजलगाव तालुक्यात पशुधन, सोलार सह शेतकऱ्यांच्या झालेल्या विविध चोर्यांचा सखोल तपास करून गुन्हेगारांवर कठोर कारवाई करा. शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार थांबवून खोळंबून पडलेली कामे त्वरित करा..

गाव-वस्ती तेथे पाणी टँकर सुरू करा..

गरिबांना घरकुलासाठी मोफत वाळू द्या.. आदी मागण्यांची प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली यावेळी माजलगाव शहरात वाहतूक विस्कळीत झाली होती यावेळी पोलीस प्रशासनाने चोक बंदोबस्त ठेवण्यात आला, उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आंदोलकांनी बैलगाड्यासह ठिय्या मांडत प्रचंड घोषणाबाजी करत केंद्र व राज्य शासनाचा निषेध केला तर शेतकऱ्यांच्या मागण्याकडे दुर्लक्ष केल्यास सरकारवर आसूड उगारला जाईल असा इशारा भाई ड.नारायण गोले पाटील यांनी दिला, यावेळी भाई मुंजा पांचाळ, भाई विष्णू शेळके, भाई राहुल सोळंके,गणेश भालेकर, बबनराव चोरमले,श्रीराम कोरडे,भाई राजाभाऊ घोडके,संभाजी चव्हाण, अशोक कुलकर्णी,सतिष शेजुळ, राधाकृष्ण पांचाळ,भगवान खांबे, चंदुकाका बालवत,राजेश्वर मोरे, कोरडे,अमोल गोले, साळुजी हांडे, चांगदेव शेजुळ, सुदाम चव्हाण, मधुकर माने लक्ष्मण बादाडे, व्यंकटी खुळे, माऊली चंदनशिव, श्रीराम शेवाळे, जनार्दन कुदळे, प्रकाश थोरात, रामेश्वर मोरे, सुशील हांडे, गणेश सोनटक्के आदींनी परिश्रम घेतले.. यावेळी शेकडो शेतकरी बांधव बैलगाड्यासह आंदोलनामध्ये सहभागी झाले होते.

'उत्कर्ष' साठी गोंडवाना विद्यापिठाच्या संघात

आनंदनिकेतन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची निवड

आनंदवन । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचे समर्थ व्यासपीठ म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना. या योजनेअंतर्गत वर्षभर विविध शिबिरांचे,स्पर्धांचे आयोजन होत असते.त्यातलीच एक महत्त्वाची राज्यस्तरीय स्पर्धा म्हणजे उत्कर्ष. उत्कर्ष २०२३-२४ राज्यस्तरीय सामाजिक, सांस्कृतिक स्पर्धा दिनांक १७ मार्च ते २० मार्च २०२४ या कालावधीत कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे आयोजित करण्यात आली आहे.आनंदाची बाब म्हणजे या स्पर्धेसाठी गोंडवाना विद्यापीठाच्या संघात आनंदनिकेतन महाविद्यालयातील आचल चिकटे, आशिष माणूसमारे व रुपेश कुत्तरमारे यांची निवड झाली.या तीनही स्वयंसेवकांचा राष्ट्रीय सेवा योजनेतील सहभाग हा कायमच उत्कृष्ट राहिलेला आहे.त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विशेष महत्त्वाचे म्हणजे यावर्षी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत झालेल्या 'आव्हान' या शिबिरासाठीही महाविद्यालयाचा विद्यार्थी रुपेश कुत्तरमारे व 'प्रेरणा' या शिबिरासाठी निकिता माणूसमारे यांची निवड झाली होती. दोघांचा या शिबिरातील सहभाग अतिशय उत्तम राहिला.त्यांच्या या यशासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मृणाल काळे,कार्यक्रमअधिकारी प्रा. मोक्षदा नाईक व प्रा.सुरेश राठोड, विभागीय समन्वयक डॉ.रंजना लाड महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,आनंदवन परिवार यांनी अभिनंदन केले आहे.

मायभूमी करंजीसाठी सदैव कटिबद्ध-वडेट्टीवार

खनिज निधी अंतर्गत कामांचे भूमिपूजन

गोंडपिपरी । प्रतिनिधी

तालुक्यातील करंजी गावचा सर्वांगीण दृष्ट्या विकास व्हावा.करंजी गाव आमची मायभूमी आहे.गावाविषयी आम्हाला आदर आहे.या गावासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.भविष्यातही या गावच्या विकासात आमच्या परिवाराचा हातभार कायम असेल.नव्या पिढीकडून गावात उत्तम काम सुरू आहे.हे एकूण समाधान वाटत,असे मत किशोर वडेट्टीवार यांनी व्यक्त केले.खनिज विकास निधी अंतर्गत विकासकामाचे भूमिपूजन सोहळ्यानिमित्त ते करंजीत बोलत होते.

राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या पुढाकाराने जन्मभूमी करंजी गावात खनिज विकास निधी अंतर्गत ७० लाखाची कामे मंजूर झाली.यातील ५ कामे पूर्णत्वास आली.दरम्यान स्थगिती आल्याने २ कामे शिल्लक राहिली.आता या कामावरील बंदि उठली.अशा करंजीतील २ बंदिस्त नाली बांधकामांचे भूमिपूजन नुकतेच पार पडले.विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचे बंधू किशोर वडेट्टिवार यांनी भूमिपूजनाचा नारळ फोडला.यावेळी सरपंच सरिता पेटकर,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक समीर निमगडे,ग्रा.पं.सदस्य निखिल बामणे,सामाजिक कार्यकर्ते आशिष निमगडे आदीसह गावकऱ्यांची उपस्थिती होती.

तळोधी (बा)ग्रामपंचायतच्या सरपंच पदी कल्पना मस्के यांची बिनविरोध निवड

तळोधी (बा) । प्रतिनिधी

नागभीड तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळखली जाणारी तळोधी ग्रामपंचायत येथील कल्पना सुभाषराव म्हस्के यांची तळोधी (बा.) च्या सरपंचपदी अविरोध निवड करण्यात आली. ८ महिन्यापूर्वी सरपंच पदाची धुरा उपसरपंच राजेश घिये यांच्या खांद्यावर होती. त्यांच्या कार्यकाल संपल्यामुळे महिला सरपंच राखीव जागे करिता कल्पना सुभाष मस्के यांची एकमताने सरपंच पदी निवड करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतचे सभा सदस्य ग्रामविकास अधिकारी मीनाक्षी बनसोड व गावकरी उपस्थित होते. नवनियुक्त सरपंच कल्पना मस्के यांचे अभिनंदन होत आहे.

ग्रा.पं.सदस्या शारदा शिरभय्ये यांच्यासह सहकाऱ्यांचा भाजपात प्रवेश

चिमूर । प्रतिनिधी

चिमूर क्षेत्राचे भाजपाचे आमदार आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया यांच्या प्रमुख उपस्थितीत चिमूर येथील निवासस्थानी तालुक्यातील नवेगाव (पेठ) येथील ग्रा. पं. सदस्या शारदा शिरभय्ये यांच्यासह सामाजिक कार्यकर्त्या शुभांगी राऊत यांनी आमदार भांगडीया यांच्या कार्यक्षम, कणखर, कार्यकुशल नेतृत्वावर व त्यांच्या विकासकार्यावर, कार्यकर्तृत्वावर तसेच विकसनशील ध्येयधोरणांवर प्रभावित होऊन भाजपात पक्षप्रवेश केला. यावेळी आमदार भांगडीया यांनी त्यांच्या गळ्यात भाजपाचा दुपट्टा टाकून पक्षात सहर्ष स्वागत केले व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शारदा शिरभय्ये व शुभांगी राऊत यांच्या पक्षप्रवेशानंतर भाजपा महिला आघाडी तालुकाध्यक्षा माया नन्नावरे, भाजपा महिला मोर्चा प्रदेश चिटणीस ममता डुकरे, भाजपा महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस प्रिया लांबट, भाजपा महिला मोर्चा जिल्हासचिव तथा महिला आघाडी तालुका महामंत्री भारती गोडे, भाजपा महिला आघाडी तालुका महामंत्री आशा मेश्राम, भाजपा महिला आघाडी शहराध्यक्षा दुर्गा सातपुते, भाजपा महिला आघाडीच्या ज्येष्ठ नेत्या ज्योती ठाकरे यांनी त्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

या पक्षप्रवेशाप्रसंगी भाजपा तालुकाध्यक्ष राजू पाटील झाडे, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ. श्याम हटवादे, भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष राजू देवतळे, भाजयुमो प्रदेश सचिव मनिष तुंम्पल्लीवार, भाजपा तालुका महामंत्री प्रशांत चिडे, भाजपा ज्येष्ठ नेते विलासभाऊ डांगे, सं.गां.नि.अ.यो. समिती चिमूर अध्यक्ष संजय नवघडे, भाजयुमो जिल्हा सरचिटणीस प्रफुल कोलते, भाजयुमो तालुकाध्यक्ष श्रीरंग (बालू) पिसे, भाजपा नेते आसिफ शेख, भाजयुमो शहर महामंत्री श्रेयश लाखे, प्रकाश असावा, योगेश कराळे व अन्य भाजपा पदाधिकारी तथा कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार भांगडिया यांच्या प्रयत्नाने तळोधी (बा) येथे विकासकामांचे लोकार्पण सोहळा संपन्न

तळोधी (बा) । प्रतिनिधी

चिमूर विधानसभेचे आमदार आणि आपल्या क्षेत्रात विकासपुरुष म्हणून ओळखले जाणारे सर्वांचे लाडके आमदार किर्तीकुमार उर्फ बंटी भांगडिया यांच्या प्रयत्नाने मंजूर जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची शाळा येथील वर्गखोली चे लोकार्पण व पशु वैद्यकीय दवाखाना चे भव्य लोकार्पण सोहळा पार पडला .

त्याप्रसंगी सरपंच कल्पना मस्के यांच्या हस्ते पूजन करून उप-सरपंच राजेश घिये यांच्या हस्ते रिबीन कापून लोकार्पण सोहळा पार पडला.याप्रसंगी उपस्थित तालुका महामंत्री जगदीश सडमाके, जीवेश. सयाम, किशोर कटारे, नरेंद्र खोब्रागडे, महेश नंदनवार, सुधाकर कामडी, वंदना चचाने, ज्योती मडावी,मंदा कश्यप,वर्षा शिरबांधे, ताटकर,विजया वाढई,सुनिता मदनकर.भाजपा युवा मोर्चा कार्याध्यक्ष नितीन कटारे,हर्षल कामडी, अनिकेत नारखेडे, अशोक ताटकर, परिमल मदनकर,डोनू पाकमोडे,पद्मा कामडी,दिलीप कामडी,अरविंद नागापुरे,महेश शिवणकर सर्व ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी गावातील नागरिक उपस्थित होते.

शंकरपूर येथे मतदान जनजागृती रॅली

चिमूर । प्रतिनिधी

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथे व परिसरातील गावातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी बालविकास प्रकल्प अधिकारी पुनम गेडाम यांच्या मार्गदर्शनात व पर्यवेक्षिका नलिनी खानोरकर यांच्या उपस्थितीत मतदान जनजागृती अभियाना अंतर्गत रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या रॅलीमध्ये जवळपास १०० मदतनीस व अंगणवाडी सेविका यांनी सहभाग घेतला. या रॅलीची सुरुवात प्राथमिक आरोग्य केंद्र शंकरपूर येथून करण्यात आली. ही रॅली गावातील मुख्य मार्गाने मार्ग क्रमन करीत व मतदान जनजागृतीच्या घोषणा देत तसेच गावातील महिलांच्या सभा घेऊन त्यांना मतदानाचा अधिकार व कर्तव्य समजावून सांगण्यात आले.गावातील ८० वर्ष पेक्षा जास्त वय असणारे वृद्ध तसेच ४०% पेक्षा जास्त

दिव्यांग असणाऱ्या मतदारांना कोणताही त्रास न घेता घरून मतदान करण्याची प्रक्रिया समजावून सांगण्यात आली. तसेच ज्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाली परंतु अद्याप मतदार नोंदणी न केलेल्या विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि तरुणांनी मतदार नोंदणी करावी असेही मार्गदर्शन करण्यात आले. एकूणच मतदारांचे मतदान हे वाया जाऊ नये त्यांनी मतदान करावे, याबाबत या रॅली मधून जनजागृती करण्यात आली.या मतदान जनजागृती रॅलीच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षिका नलिनी खानोरकर, पर्यवेक्षिका सुकेशिनी खोब्रागडे, पर्यवेक्षिका प्रज्ञा लुभाने, पर्यवेक्षिका सविता शेंडे यांनी परिश्रम घेतले.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात विश्वशांती विदयालय,मारोडा तालुक्यात प्रथम

मूल । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात विश्वशांती विदयालय तथा उच्च माध्यमिक विदयालय,मारोडा तालुक्यात प्रथम आली आहे.त्यामुळे परिसरात शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या उपक्रमाअंर्तगत मुल तालुक्यात अनेक शाळा सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये विश्वशांती विदयालयाने प्रथम क्रमांक पटकाविला.श्रद्धेय वामनराव पाटील गड्डमवार यांची प्रेरणा घेत संस्थेचे अध्यक्ष संदिप पाटील गड्डमवार व संस्थेचे सचिव राजाबाळ पाटील संगीडवार तसेच शाळा समिती अध्यक्ष सुनील बल्लमवार यांच्या मार्गदर्शनात शाळेचे मुख्याध्यापक सुनील येनगंटीवार यांच्या पुढाकाराने शाळेत प्रत्यक्ष गावांत जाऊन पालक सभा तसेच दर शनीवारला गावात स्वच्छता उपक्रम,माजी विदयार्थी संघ,शाळा मंत्रीमंडळ

स्थापना,पर्यावरण संरक्षण,आरोग्य तपासणी,विविध क्रिडा व इतर स्पर्धा तसेच विदयार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी अनेक शैक्षणिक उपक्रम सुद्धा राबविल्या जातात.याकरीता शाळेतील शिक्षक विक्रांत पुददटवार,जिवन वाढई ,केवल धारणे,सुशांत आक्केवार, ललिता मुस्कावार, पुरुषोत्तम कुनघाडकर,मधूकर गेडाम,संदिप निमगडे, मारोती कावळे,अक्षय येनुगवार,शुभांगी पिपरे, शलाका बोरकर,प्रियंका मिसार व शिक्षकेत्तर कर्मचारी निलेश अल्लुरवार,मनोज ताटकोंडावार,सुरेश सुमंतवार, प्रशांत गोवर्धन,स्वराज मंगाम तसेच शाळेतील सर्व विदयार्थ्यांनी अथक परिश्रम घेऊन शाळेला नवी दिशा देण्याचे कार्य केले त्यामुळे सर्वत्र शाळेचे कौतुक होत आहे.

चंद्रपुरच्या 'भारतमाता' शब्दाची गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

वनमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून ६५ हजार ७२४ रोपट्यांपासून निर्मिती

गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र प्रदान

चंद्रपूर । प्रतिनिधी

राज्याचे वनमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राचा वन विभाग एकामागून एक यशाचे टप्पे गाठत आहे. आतापर्यंत वनविभागाने चार लिमका बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड केले. आता ६५७२४ रोपट्यांपासून 'भारतमाता' या शब्दांची निर्मिती करून वनविभागाने गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नाव नोंदवून वन विभागाने आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

चंद्रपूर येथे वनविभागाच्या वतीने १ ते ३ मार्च या कालावधीत 'ताडोबा महोत्सव २०२४' आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवांतर्गत वेगवेगळ्या प्रजातींच्या रोपट्यांपासून 'भारतमाता' हा शब्द लिहून वर्ल्ड रेकॉर्ड करण्याचा संकल्प वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केला होता. हा संकल्प आज (शनिवारी) चंद्रपुरातील रामबाग येथे प्रत्यक्षात साकारण्यात आला. २६ प्रजातींच्या तब्बल ६५७२४ रोपट्यांनी 'भारतमाता' या शब्दाची निर्मिती केली आणि गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र प्राप्त केले.यावेळी बोलताना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'आतापर्यंत वन विभागाने चार लिमका रेकॉर्ड केले. आता मात्र प्रथमच राज्याच्या वनविभागाने गिनेस बुक ऑफ वर्ड रेकॉर्ड केला आहे. यासाठी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सर्व वन अधिकारी, वन कर्मचारी अभिनंदनास पात्र आहेत. चंद्रपुरात ६५७२४ रोपट्यांनी लिहिलेल्या 'ग्रीन भारतमातेचा' संकल्प संपूर्ण जगभरात पोहचला असून ही आमच्यासाठी केवळ एक फोटो फ्रेम नसून प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा महामार्ग आहे.' कार्यक्रमाला वनविभागाचे प्रधान सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसरंक्षक (वन्यजीव) तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) शोमिता विश्वास, महिप गुप्ता, ताडोबाचे क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड टीमचे स्वप्नील डांगरीकर, वनअधिकारी प्रशांत खाडे, मिलिंद वेर्लेकर आदी उपस्थित होते.

त्वरित उद्यान करण्याच्या सूचना

ग्रीन भारतमातेच्या शब्दातील सर्व रोपट्यांचे चंद्रपूर येथे गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड या नावाचे वनविभागाने एक चांगले उद्यान त्वरीत साकारावे. तसेच आज मिळालेले प्रमाणपत्र हे तेथे दर्शनी भागात लावावे. विशेष म्हणजे ही रोपटे सुध्दा नवनिर्मित उद्यानामध्ये 'भारतमाता' याच शब्दाप्रमाणे लावावीत, अशा सुचनाही त्यांनी केल्या. यापुढेही राज्याचा वनविभाग असाच अग्रेसर राहणार असून या विभागाच्या प्रगतीमध्ये कोणतीही अडचण येऊ देणार नाही. वनविभागासोबत नागरिकांनी असेच आशिर्वाद आणि शुभेच्छा कायम ठेवाव्यात, असे आवाहन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

महानगर महिला मोर्चा तर्फे शक्तीवंदन मॅराथॉन ४ मार्च ते ६ मार्च पर्यंत आयोजन

रन फॉर नेशन,रन फॉर मोदी उपक्रम

चंद्रपूर । प्रतिनिधी

महानगर भारतीय जनता पार्टी अंतर्गत असलेल्या महानगर महिला मोर्चा तर्फे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात ३ दिवसीय शक्तीवंदन कार्यक्रमाचे आयोजन ४,५ व ६ मार्चला करण्यात आले आहे.

मॅराथॉन २०२४ या उपक्रमाची सुरवात ४ मार्चला सकाळी ७ वाजता केली जाणार आहे.महानगर जिल्हाध्यक्ष राहुल पावडे व महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सविता कांबळे यांच्या नेतृत्वात हे आयोजन करण्यात येत असून 'रन फॉर नेशन,रन फॉर मोदी'अशी संकल्पना घेऊन मातृशक्तीला वंदन केले जाणार आहे.या उपक्रमासाठी वयोगट १४ ते ४५ व ४५ च्यावर वयाच्या महिला असे २ गट तयार करण्यात आले आहेत. ४ मार्च २०२४ सकाळी ०७ वाजता मॅरोथॉनची सुरवात गांधी चौक येथून होणार असून जटपुरा गेट ते गिरणार चौक व परत गांधी चौक येथे मॅराथॉन समाप्त होईल.दोन्ही गटातील विजेत्यांना आकर्षक पुरस्कार दिले जाणार असून सर्वांना सहभाग प्रमाणपत्र वितरित केले जाणार आहे.५ मार्चला मोटार सायकल रॅलीमोटरसायकल रॅलीचे आयोजन ५ मार्चला सायं ४ वाजता करण्यात आले असून शिवाजी चौक ते कोतपल्लीवार पेट्रोल पंप असा प्रवास रॅलीचा असणार आहे.६ मार्चला पंतप्रधान नरेन्द्र मोदींचे संबोधन पंतप्रधान नरेंद्र मोदी शक्तीवंदन निमित्य विशेषत्वाने महिलांना संबोधित करणार असून महानगरातील ५ मंडळात याचे थेट प्रक्षेपण बघण्याची व्यवस्था महिला मोर्चा तर्फे करण्यात आली आहे.मॅरॉथॉन व मोटारसायकल रॅलीसाठी इच्छुकांनी महिला मोर्चाच्या शितल गुरनुले (७०५८०७४६०४,) माया उईके (७४९९६७१५३७), स्मिता रेभनकर (९७६३६४३७०३),शिला चव्हान (९८८१६८३९०१) यांचे सोबत संपर्क साधावा असे आवाहन सुषमा नागोसे यांनी केले आहे.

सत्यनारायण कथेला फाटा देत ग्रामगीता वाचनाने केले वास्तुपूजन

लोनगाडगे कुटुंबीयांचे परिवर्तनीय कार्याची चर्चा;कौतुकास्पद कार्य

राजुरा । प्रतिनिधी

तालुक्यातील कढोली बु.गावातील कविता व महादेव लोनगाडगे,सुकन्या अश्विनी व सुपुत्र प्रतिक लोनगाडगे या लोनगाडगे कुटुंबीयांनी त्यांचे नविन घराचे वास्तुपूजन गृहप्रवेश निमित्त पूजापाठ व सत्यनारायण कथेला फाटा देत गावातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे पुर्णाकृती पुतळ्याला माल्यार्पण करुन कार्यक्रमाला सुरुवात केली.नविन वास्तुत श्रीगुरुदेव अधिष्ठाणाची, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व दिवंगत वडील तुळशीराम लोनगाडगे यांच्या प्रतिमेची स्थापणा केली. याप्रसंगी सुधाकर झाडे यांनी ग्रामगीता ग्रंथाचे वाचन केले व भजनांचा कार्यक्रम झाला त्यामुळे राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचे विचाराचा प्रसार झाला त्यांचे स्तुत्य व परिवर्तनवादी उपक्रमा बद्दल अनेकांनी महादेव लोनगाडगे कुटुंबीयांचे कौतुक केले. याप्रसंगी लक्ष्मनराव गमे सर्वाधिकारी श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम, माला गमे, अभिजीत गमे, सारिका गमे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रतिमा व ड.राजेंद्र जेनेकर केंद्रिय सदस्य, ड.सारीका, सुपुत्री प्रगती,सुपुत्र चैतन्य जेनेकर यांनी श्रीगुरुदेव साहित्य देवराव कोंडेकर,मालु कोंडेकर,ऋग्वेद कोंडेकर ऊर्जानगर यांनी ग्रामस्वराज्य दिनदर्शिका व महा अंनिस पत्रिका भेट दिली यावेळी किशोर झाडे प्रचारक, नातेवाईक, आप्तेष्ट गावकरी मंडळींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथील ८० लक्ष रुपयांच्या कामाचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भुमिपूजन

चंद्रपूर । प्रतिनिधी

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत ८० लक्ष रुपयांच्या निधीतून शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथील सिमेंट काँक्रीटच्या रोडचे बांधकाम करण्यात येणार आहे. सदर कामाचे आज आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भुमिपूजन करण्यात आले. यावेळी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी वैभव बोनगीरवार, सेवा निवृत्त प्राचार्य रविंद्र मेहेदंळे, सहाय्यक प्रशिक्षणार्थी प्रणाली डहाटे, प्राचार्य आर. बी वानखेडे, बंडोपंत बोढेकर, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास केल्या जात आहे. दरम्यान येथील सिमेंट काँक्रीट रोडच्या बांधकामाची मागणी आमदार किशोर जोरगेवार यांच्याकडे करण्यात आली होती. सदर कामासाठी जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत ८० लक्ष रुपयांचा निधी देण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रयत्न केले होते. अखेर सदर कामासाठी ८० लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामाचे आज आमदार किशोर जोरगेवार यांच्या भुमीपूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमधील कलागुणांना आकार देण्याचे काम शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातुन केल्या जात आहे. येथुन निघणारा विद्यार्थी हा कौशल्य प्राप्त करुन निघतो. याचा त्याला रोजगार उपलब्धीसाठी उपयोग होतो. अश्या संस्था बळकट झाल्या पाहिजे. येथे सोई सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजे. यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून शक्य ते सर्व सहकार्य करण्याची आमची भूमिका असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला प्राध्यापक आणि विद्यार्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

नगरपंचायतीचे सार्वजनिक मुत्रिघर ठरत आहे दारुड्यांचा अड्डा

गोंडपिंपरी । सूरज माडूरवार

गोंडपिपरी नगरपंचायतीचे बाजारपेठेत असलेले सार्वजनिक मुत्रिघर दारुड्यांचा अड्डा बनल्याचे विदारक चित्र पाहायला मिळत आहे.

नगरपंचायत अंतर्गत शहरात येणाऱ्या खेडो पाड्यातील महिला पुरुष यांची अडचण लक्षात घेता.भाजीपाला मारकेटला लागून राष्ट्रीय महामार्गा जवळ सार्वजनिक मुत्रीघर निर्माण करण्यात आले.परंतु त्या मुत्रीघरात मोठ्या प्रमाणात मध्यपी दारू पितात दारूच्या रिकाम्या शेकडो बाटलांचा खच तिथे आढळून येत आहे.सोबतच

मुत्रीघराला दरवाजा नसल्याने भाजी मार्केट परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत असते.दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून तात्काळ नगरपंचायतीने स्वच्छते सोबत त्या मुत्रीघराला दरवाजा लावण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून केल्या जात आहे.

वनमंत्री सुधीर मुनगंटीवारांचे नेतृत्व आणि गावकऱ्यांच्या सहकार्याने साकारले स्वप्न

वाघांच्या जतनाबाबत देशाची शान ठरलाय ताडोबा-रविना टंडन

चंद्रपूर । प्रतिनिधी

वाघांचं जतन करून त्यांची संख्या वाढविण्याबाबत संपूर्ण देशाला जो अभिमान वाटतो, त्याचे सर्वाधिक श्रेय ताडोबाचे आहे. राष्ट्रीय संपदा, माणसं आणि निसर्गाचा समतोल राखत ही जी निसर्ग रक्षणाची घोडदौड चालली आहे, त्याचे श्रेय वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे कुशल नेतृत्व, वनविभागातील कर्मचाऱ्यांचे समर्पण आणि जंगलातील गावकऱ्यांचे सहकार्य यामुळे साकार होऊ शकले आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री व वन्यजीव सद्भावना दूत रविना टंडन यांनी शुक्रवारी चंद्रपूर येथे केले.

वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून आयोजित चंद्रपूरच्या चांदा क्लब मैदानावर तीन दिवसीय ताडोबा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी विभागाचे प्रधान सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा वनबलप्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, वाइल्ड लाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संचालक विरेंद्र तिवारी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) शोमिता विश्वास, महिम गुप्ता, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक प्रवीण चव्हाण, वन अकादमीचे संचालक श्रीनिवास रेड्डी, ताडोबाचे क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आदि मान्यवरांची उपस्थिती होती .या प्रसंगी बोलताना रविना टंडन अक्षरशः भावूक झाल्या. 'माझं ताडोबाशी फार जवळचं आणि भावनिक असं नातं आहे. मी अनेकदा इथे येते. ताडोबाच्या जंगलातील वाघ आणि

त्यांचे परिवार ओळखता यावेत इतकी भटकंती मी ताडोबात केली आहे. ताडोबा हे प्रेमाचं जंगल आहे. इथे आलं की माणूस या जंगलाच्या मोहात पडतो,' अशा भावना व्यक्त करतानाच, पर्यावरण, जंगल आणि वाघांच्या संवर्धनासाठी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार अतिशय स्तुत्य उपक्रम राबवित असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले.आपल्या भाषणात रविना टंडन यांनी वनसंवर्धनाचं काम करणाऱ्या वन कर्मचाऱ्यांपासून तर जिप्सी चालक, गाईड आणि गावकरी सर्वांना श्रेय बहाल करत, असंच काम करत राहण्याचं आवाहन केलं. एखाद्या वाघिणीने पिलाला जन्म दिल्याची बातमी जशी आनंद देऊन जाते, तसेच एखाद्या वाघाच्या मृत्यूची घटना तेवढीच वेदनादायी असते. पण एक मात्र खरं आहे की ताडोबाच्या जंगलाची जादू जगात कुठेही बघायला मिळत नाही. म्हणूनच या टायगर कॅपिटलची महती मी जगाला सांगणार आहे. जगाच्या पाठीवर जिथे जाईल तिथे ताडोबाचा झेंडा फडकावणार असल्याची ग्वाही देखील रविना टंडन यांनी यावेळी दिली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .